EDUTECH ®
ACADEMY
NURTURING THE FUTURE...
Classes 5 to 10

**SET A**

# N 614

**Seat No.** | | | | | | | |

**2026 I 04 1100** **– N 614 - MARATHI (16) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)**

## (REVISED COURSE)

**Time : 3 Hours** **(Pages 8 )** **Max. Marks : 80**

---

**कृतीपत्रिकेसाठी सूचना :-**

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.

(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(३) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्य कता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.

(४) विभाग ५- उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**विभाग - १ : गद्य**

**Q.1 (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **7**

प्र. 1. अ. चौकट पूर्ण करा. (1)

i. वाघीण पिल्लांना कोणत्या झुडपात लपवून गेली → [ ]

ii. पिलांचे संभाव्य शत्रू कोणते → [ ]

आ. पिल्लांनी त्यांची आई आल्याचा आनंद कसा व्यक्त केला. (1)

"ऑऽ व्हऽऽ" अचानक नाल्याच्या पलीकडून आलेल्या या बारीक आवाजानं मी जागीच थबकलो. माझ्या अंगावर सरसरून काटा आला. एक वर्षाच्या वाघांच्या अभ्यासानं आणि अनुभवानं हे ठाऊक होतं, की हा वाघिणीचा आवाज आहे. ती या आवाजानं आपल्या पिल्लांना बोलवत असावी. अचानक पाण्यात 'धपकन' काहीतरी पडल्याचा आवाज आला. मी पाणवठ्याकडं पाहिलं आणि आश्चर्यानं थक्कच झालो. एका पिल्लानं बाजूच्या जांभळीच्या झाडीतून थेट पाण्यात उडी घेतली होती. लगेच त्याच्या पाठोपाठ उरलेली तीनही पिल्लं धपाधप पाण्यात उतरली. आईचा आश्वासक आवाज त्यांच्या करता उत्साहाचं वारं भरणारा ठरला होता.

वाघीण रात्रीच पिल्लांना नाल्याकाठच्या जांभळीच्या दाट झुडपात लपवून शिकारीसाठी गेली होती. या परिसरात दुसरे नर वाघ, बिबळा, रानकुत्री अशा पिल्लांच्या संभाव्य शत्रूंचा राबता होताच. त्यामुळं तिला ही खबरदारी घेणं आवश्यकच होतं. वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो. त्यामुळं वाघीण पिल्लांच्या सुरक्षे बद्दल भलतीच दक्ष असते. आता ती रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली होती. आईची हाक ऐकताच अजूनवर दडून बसलेली पिल्लं

खेळकरपणे तिच्याकडं झेपावली होती. तेवढ्यात नाल्याच्या डावीकडच्या विरळ बांबूमधून मला वाघीण येताना दिसली. ती सरळ पाण्याजवळ आली आणि वळून पाण्यात बसली. रात्रभरच्या वाटचालीनं थकून ती विश्रांती घेत होती; पण पिल्लांच्या उत्साहाला आई बघताच उधाण आलं होतं. त्यांतील एका पिल्लानं तर वाघिणीच्या पाठीवरच उडी घेतली; पण तिथून घसरल्यानं ते धपकन पाण्यात पडलं. तोंडावर पाणी उडताच वाघिणीनं मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली; पण पिल्लांना त्याच्याशी काहीच देणं-घेणं नव्हतं. त्यांचा आईच्या भोवती जबरदस्त दंगाधोपा सुरू झाला.

प्र. 2. थोडक्यात सांगा. (2)

i. वाघीण पिल्लांच्या दक्षतेबद्दल सतर्क का असते ?

Ii. पिल्लांच्या कोणत्या कृत्यामुळे वाघीणीने गुरगुरुन नापसंती व्यक्त केली ?

प्र. 3. वाघीण आणि तिच्या पिल्लांची भेट हा प्रसंग शब्दबद्ध करा. (3)

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **7**

प्र. 1. चौकटी पूर्ण करा. (2)

i) रेखा मावशीच्या रोजच्या जगण्यात जगण्यात या गोष्टीला वाव नाही – [ ]

ii) प्रदूषण करुन आपण या गोष्टीला हातभर लावतो [ ]

iii) तापानं फणफणलेली [ ]

iv) स्नेहलला हवी असणारी बाब [ ]

''काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्या पेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत'', सुमित बोलत होता. ''बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत'', स्नेहल गहिवरून म्हणाली.

अभिषेक भारावून म्हणाला, ''माझ्यातर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार. ठरलं एकदम!''

''खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्या ला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्या करिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट'', अभिषेकचे बाबा म्हणाले.

रेखामावशी सगळ्यांचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या . बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.

''पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी'', सुमित म्हणाला.

‘‘पण आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे मात्र, आपल्याला इतक्या सहजतेने नाही बरं पुसता येणार. त्या करता आपल्याला झाडं लावावी लागतील... या हिरव्या गर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील’’,
सुमित भरभरून बोलत होता. ‘‘हो ना, नाही तर आपण तसेच धावत राहू. मळलेल्या पायांची माणसं बनून!’’ पावडेकाका बोलले आणि त्या निळ्याशार तुकड्यावर चांदणं उमलल्याचा त्यांना भास झाला.

प्र. 2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (2)

i) स्नेहल व अभिषेक यांनी कोणता निश्चय केला ?


ii) पावडे काकांचा चेहरा का पडला ?

प्र. 3. 'आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे, आपल्याला सहजतेने पुसता येत नाहीत'या विधानाचा तुम्हाला कळलेला अर्थ स्पष्ट करा. (3)

**(इ) अपठित गद्य** **4**

**उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1. आकृतिबंध पूर्ण करा. (2)




'माझं विदयापीठ' प्रकाशित झाल्यानंतर मास्तरांचे कार्यक्रमाचे दौरे वाढलेच, शिवाय कसल्या कसल्या समित्यांवर, अभ्यास मंडळांवर त्यांची नियुक्ती झाली आणि मास्तर त्या गराडयात अगदी आनंदाने गुरफटून गेले. 1972 पासून प्रभादेवी इथल्या 'लोकवाड्.मयगृह' मासिकाचे संपादक म्हणून रुजू झाले. तिथे तर अनेक कॉम्रेड मंडळींचा राबता असायचा. अनेकांची पुस्तके मास्तरांनी 'लोकवाड्.मयगृहा' तर्फे प्रकाशित केली. अनेक बडया मंडळींसोबत मास्तर काम करायचे. लोकवाड्.मयगृहाचं ऑफीस म्हणजे चळवळीतल्या लोकांना बालेकिल्लाच होता. सकाळी शाळा, दुपारी थोडा वेळ घरी आले तर आले; नाहीतर सरळ लोकवाड्.मयगृहातच असायचे. एकदम रात्री घरी यायचे.
महाराष्ट्राबाहेरही मास्तरांची फिरती सुरू झाली. साहित्य अकादमीच्या समितीवरही त्यांची वर्णी लागली होती. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी मास्तर दिल्ली, भोपाळ, कलकत्ता (कोलकाता) अशा अनेक ठिकाणी जात होते. सांगते काय, घरातल्या, संसाराच्या जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या नाहीत, पण साहित्य क्षेत्रातल्या मोठयामोठया जबाबदाऱ्या मात्र अगदी यशस्वीरीतीने सांभाळल्या.

2. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

1. मास्तरांची वर्णी कुठे लागली होती ?
2. लोकवाड्मयगृहाचं ऑफिस म्हणजे कोणाचा बालेकिल्ला होता ?

**विभाग - २ : पद्य**

Q.2 **(अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.** **8**

प्र. 1. अ. आकृतिबंध पूर्ण करा : (2)

उत्क्रांतीचा ललकार घुमवणारे घटक

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार
नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ।।
फुलामुलांतून हसतो श्रावण
मातीचे हो मंगल तनमन
चैतन्याचे फिरे सुदर्शन
शेतामधुनी पिकवू मोती, धन हे अपरंपार ।।
या हातांनी यंत्र डोलते, श्रम शक्तीचे मंत्र बोलते
उद्योगाचे चक्र चालते, आभाळावर उत्क्रां तीचा घुमवू या ललकार ।।
हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार ।।
या विश्वाची विभव संपदा
जपू वाढवू आम्ही लाखदा
हस्त शुभंकर हवा एकदा
भविष्य उज्ज्वल या देशाचे करूया जयजयकार ।।

प्र. 2. उत्तरे लिहा: (2)

i) फुलामुलांतून हसतो
ii) आभाळावर घुमणारा ललकार
iii) हातांमुळे डोलते
iv) शेतांमधून पिकवू

प्र. 3. कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा : (2)

(i) अधिकार (ii) चक्र (iii) उज्वल (iv) हस्त

प्र. 4. 'घराघरातून जन्म घेतसे तेज नवा अवतार' या ओळींचे भावसौंदर्य स्पष्ट करा. (2)

**(आ) खालील मुदद्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा:** **8**

**(ii)**


| | 'हिरवंगार झाडासारखं' किंवा 'औक्षण' | |
|---|---|---|
| 1. प्रस्तुत कवितेचे कवी/ कवयत्री -<br>2. प्रस्तुत कवितेचा विषय -<br>3. दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ – | 'झाडांच्या पानावरुन वहीच्या पानावर।<br>अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब।।' | 'तुझ्या शौर्या पुढे।<br>त्याची केवढीशी शान।।' |
| 4. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण<br>5. प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा | (i) खुडलेल्या<br>(ii) पालवी<br>(iii) मरगळ<br>(iv) मंजुळ | i) औक्षण<br>ii) आसवं<br>iii) तोफ<br>iv) दीन |

**विभाग - ३ स्थूलवाचन**

**Q.3 खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा:** **6**

(i) व्युत्पत्ती कोशात शब्दाविषयी कोणती माहिती दिलेली असते ?

(ii) पाठाबाहेरची उदाहरणे शोधून खालील कृती करा.




(iii) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत:च्या कल्पनेने लिहा.

**विभाग - ४. भाषाभ्यास**

**Q.4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती:**

**(१) खालील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा.** **2**

(i) वा ! समुद्राचे हे रूप डोळ्यांचे पारणे फिटवणारेच !

(ii) बाहेर ऊन आहे का ?

**(२) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात बदल करून वाक्ये पुन्हा लिहा :** **2**

(i) शांततेला खूप आवाज असतो. (उद्गारवाचक करा.)

(ii) विजेला कमीत कमी वापर करावा. (आज्ञार्थी करा)

**(३) दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा: (कोणत्याही दोन)** **4**

(i) गमावून बसणे

(ii) हकालपट्टी करणे

(iii) सक्त ताकीद देणे

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती:**

**शब्दसंपत्ती-**

**(१) समानार्थी शब्द लिहा:** **1**

चरितार्थ =

चक्र =

**(२) विरुद्धार्थी शब्द लिहा:** **1**

पक्की x

पडका x

**(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **1**

जास्त जमीन असलेला -

**(४) वचन लिहा :** **1**

शिखर

दिवस

**(५) लेखननियमांनुसार अचूक शब्द लिहाः** 2

(i) मंदीर / मन्दिर / मंदिर / मदिंर

(ii) प्रक्रिया / परकीया / प्रक्रीया / परक्रिया

**(६) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करुन वाक्ये पुन्हा लिहा.** 1

आईने नाराजी व्यक्त केली पण उपयोग झाला का

**(७) खालील चिन्हांचा नावे लिहा:** 1

l

**विभाग - ५ : उपयोजित लेखन**

**Q.5 (अ) खालील कृती सोडवा** 6

**(१) पत्रलेखन**

खुशखबर! खुशखबर !

अजब गजब प्रकाशन तर्फे

उत्कृष्ट काव्य पुरस्कार प्रदान सोहळा

पुरस्कारार्थी : - कवी संदीप खरे - नामवंत कवी

कार्यक्रमस्थळी सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत

काव्यसंग्रह विक्री विशेष सवलती सहित

स्थळ : अजब गजब कार्यालय

↓ ↓

सुरेश / सुरेखा शहाणे, नूतन विद्यालय, ठाणे विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने पत्र लिहीत आहे

प्रकाशकांकडे काव्य संग्रह मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

नामवंत कवी संदीप खरे यांच्या बालकाव्य संग्रहाला पुरस्कार मिळाल्या बद्दल अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

**(२) सारांशलेखन**

**विभाग - १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्या चा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.** 6

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा:** 10

**(१) जाहिरांत लेखन** 5

**खालील जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती करा.**

सरस्वती योग कुटीर तर्फे आयोजित केल्या गेलेल्या योग शिबिराची जाहिरात करा.

**(२) बातमी लेखन** **5**

दिनांक २० मे रोजी पुण्यात पटकथा लेखन कार्यशाळा आयोजित केली गेली त्या संदर्भातील बातमी तयार करा.

**(३) कथालेखन:** **5**

पुढील शब्दांना गुंफून अर्थपूर्ण कथा तयार करा : (शब्द मर्यादा 80 ते 100
राजा, गरीब मनुष्य , 'बक्षिस'

**(इ) लेखनकोशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **8**

**(i)** **नाशिक जिल्हा परिषद शिक्षण विभाग, नाशिक आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा**

**पारितोषिक वितरण समारंभ**

दिनांक : २७ डिसेंबर — **वेळ : सकाळी ९.०० वाजता**


प्रमुख पाहुणे – माननीय शिक्षणाधिकारी, नाशिक

वरील समारंभप्रसंगी तुम्ही तुमच्या लहान भावाचे/बहिणीचे कौतुक करण्यासाठी उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(ii)** पुढील आत्मवृत्त लेखन करा :
झाडाचे मनोगत



**(iii)** पुढील मुद्द्याच्या आधारे 'ध्वनी प्रदूषण - एक समस्या' या विषयावर लेखन करा.




**....All The Best....**

EDUTECH ACADEMY
NURTURING THE FUTURE....
SCHOOL SECTION

**CIDCO BRANCH**
9168 444 999
1ST FLOOR, INFRONT OF BALIRAM PATIL SCHOOL

**HARSUL-SAWANGI BRANCH**
9168 044 999
1ST FLOOR, INFRONT OF PANAD SUPER MARKET